File No.SMC-11012(21)/137/2021-SMC-GAD

सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.सआस/कक्ष-1/आस्था-2/525
सामान्य प्रशासन विभाग,
सोलापूर दि.20/10/2021
E- 27821

# -: जाहिरात :-

## WALK - IN- INTERVIEW

**दि.26/10/2021, वेळ दुपारी 01.00 वाजतां**

**( अर्ज स्विकारण्याची वेळ :- सकाळी 10.00 ते 12.00)**

**स्थळ :- सोलापूर महानगरपालिका, इंद्रभुवन, सोलापूर.**

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभाग अंतर्गत प्राणी संग्रहालयाकरीता खालील नमूद पदी तात्पुरत्या स्वरुपात **सहा महिन्याच्या** कालावधी करीता खालील शैक्षणिक पात्रताधारण करणा-या पात्र उमेदवारांकडून अथवा सेवानिवृत्त शासकिय / निम शासकिय सेवेतून सेवा निवृत्त सेवकाकडून Walk - in- Interview व्दारे खालील शर्ती व अटीवर भरण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | एकवट वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | प्राणी संग्रहालय संचालक | 1 (एक) | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी एम.व्हि.एस.सी.<br>• अनुभव : प्राणी संग्रहालयाशी संबंधीत कामाचा 5 वर्षाचा अनुभव आवश्यक (झु क्युरेटर पदाचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल.) | एकवट मानधन रुपये 33,000/- प्रति माह यावर सहा महिन्याच्या कालावधी करिता नियुक्ती राहील. सहा महिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप व्यपगत होईल. |
| 2. | पशु वैद्यकिय अधिकारी | 1 (एक) | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.व्हि.एस.सी. अँड ए.एच. पदवी अथवा एम.व्हि.एस.सी. (मेडिसीन)<br>• अनुभव : पशु वैद्यकिय अधिकारी कामाचा 5 वर्षाचा अनुभव आवश्यक | एकवट मानधन रुपये 20,000/- प्रति माह यावर सहा महिन्याच्या कालावधी करिता नियुक्ती राहील. सहा महिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप व्यपगत होईल. |

**शर्ती व अटी :-**

1. वर नमूद पदाकरीता सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना प्राधान्य राहिल
2. मा.शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही - 2010/प्र.क्र.17/2000/12 दि.1 जुलै 2005 नुसार कुटुंबाची अट लागू असून त्यानुसार दि.28 मार्च 2005 नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असु नये. सदर नियमाचे प्रतिज्ञा पत्र नमुना 'अ' नुसार उमेदवारांने सादर करावयाचे आहे.
3. आपली नियुक्ती ही एकवट मानधनावर असून पूर्णवेळ काम करण्याच्या अटीवर राहिल. ü सहा महिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप व्यपगत होईल याची नोंद घ्यावी.
4. संबंधीत उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी पोलीस यंत्रणेमार्फत करून घेण्यात येईल.
5. इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी त्यांच्या संपूर्ण परिचयपत्र, सर्व आवश्यक कागदपत्रांच्या एक सांक्षाकिंत प्रती, पासपोर्ट साईज फोटो व मुळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह वरील तारखेस दिलेल्या वेळेत उपस्थित रहावे.
6. अनुभव नसलेल्या उमेदवारांनी अर्ज करू नये. अर्ज केल्यास सदर अर्जाचा विचार केला जाणार नाही.

7. उमेदवारांनी मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहणेचे आहे.
8. स्थानिक परिस्थितीनुसार शर्ती व अटी बाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील सदर व इतर शर्ती व अटी सो.म.पा.च्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिले आहे.
9. कोणतेही कारण न देता निवड प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे/रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील.
10. नियुक्तीसाठी कसल्याही प्रकारचा दबाव/गैरमार्गाचा अवलंब केल्यास उमेदवारी कोणत्याही टप्यावर कसलीही कल्पना न देता रद्द करण्यात येईल व त्याबद्दल कसलीही तक्रार करता येणार नाही.
11. सदरची नियुक्ती ही केवळ ठराविक कालावधी करीता व नमूद एकवट मानधनावर तात्पुरत्या स्वरूपाचे असल्याने नियुक्ती पूर्वी रु.100/- च्या स्टँम्प पेपरवर सर्व शर्ती व अटी मान्य असलेबाबत प्रतिज्ञापत्र करुन दयावे लागेल.
12. इच्छुक उमेदवारांनी सदर दिवशी सकाळी 10 ते 12 या वेळेत अर्ज सादर करावा. कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी सोबत मूळ कागदपत्रे आणावी.

( पुष्पगंधा भगत)
सहाय्यक आयुक्त
सोलापूर महानगरपालिका.

Signed by Pushpgandha Bhagat
Date: 20-10-2021 12:26:16
Reason: Approved